C.C. (Legal) 1812

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.),

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, ता. जि. ठाणे - 401 101

जा.क्र. मिभा / मनपा / नर /4432/2018-19 दिनांक - 23/12/2018

प्रति,

अधिकार पत्रधारक - मे. स्कायलार्क रिअलटर्स प्रा.लि.

द्वारा- सल्लागार अभियंता - मे. अर्बिडीज

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - घोडबंदर सर्वे क्र./ हिस्सा क्र. मौजे घोडबंदर, स.क्र. 21/2ए(पै.), 21/2बी(पै.), 22/2,5 24/3, 25/1, 26/5,8(पै),9, 110/1पै., 112/2पै., 113/2,116/1,8,9 117/1,3,4, 5,6, 118/2,3,4,5,7,8, 125/2,3,4,5,6,7, 126/1 ते 6, 127/1,3,5, 133/1,2,7, 134/2,3,5अ,8, 148/2, 113/1, 114/1,3,4,6, 132/3, 133/6,8, 20/8पै., 22/1बी, 22/1सी, 22/3 या जागेत नियोजित बांधकामास सुधारीत नकाशे मंजूरीसह बांधकाम प्रारंभपत्र मिळणेबाबत.

संदर्भ :- 1) आपला दि.26/09/2018 चा प्रस्ताव.

2) मे. सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील आदेश क्र. यु.एल.सी./टिए/घोडबंदर/एसआर-30/42, दि.20/12/2010 अन्वयेचे पत्र व यु.एल.सी. विभागाकडील कलम 10(3) 10(5) ची कार्यवाही झालेली नसलेबाबत रु.500/- चे दि.9/05/17 व दि.15/01/18 रोजीचे बंधपत्र

3) मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील अकृषिक परवानगी आदेश क्र. महसूल/क-1/टे-7/एनएपी/एसआर-126/93 दि.29/10/1993,

4) तहसीलदार, ठाणे यांचेकडील पत्र क्र. महसुल/क-1/टे-2/जमिनबाब/कावि-8502/एसआर-तह-85/2016 दि.06/06/2016, महसूल/क-1/टे-2/जमिन बाब/कावि/8504/एसआर तह 84/2016 दि.06/06/2016, महसूल/क-1/टे-2/जमिनबाब/कावि-7513/एसआर-76/2016, दि.01/06/2016 अन्वये विनिश्चिती दाखला.

5) तहसीलदार, ठाणे यांचेकडील पत्र क्र. महसूल/क-1/टे-2/जमिनबाब/कावि/12517/2017, दि.31/07/2017 अन्वयेचा रुपांतरीत कर भरणा दाखला

6) स.क्र. 26/5 करिता दि.27/03/2018, स.क्र. 134/3 करिता दि.21/03/2018, स.क्र. 126/6, 125/3 करिता दि.31/01/2018 रोजीची रुपांतरीत कर भरणा पावती.

7) पर्यावरण विभागाचे पत्र क्र.एफ.नं.21-3/2016-IA-III दि.19/09/2017 अन्वये नाहरकत दाखला

8) Directorate of Maharashtra fire service पत्र क्र. MFS/51/2018/627, दि.07/09/2018 अन्वये नाहरकत दाखला.

9) या कार्यालयाचे पत्र क्र. मिभा/मनपा/नर/1834/2017-18 दि.09/08/2017 अन्वयेची सुधारीत बांधकाम परवानगी.

10) या कार्यालयाचे पत्र क्र. मिभा/मनपा/नर/401/2018-19 दि.17/04/2018 अन्वयेची सुधारीत बांधकाम परवानगी.

11) या कार्यालयाचे पत्र क्र. मिभा/मनपा/नर/3410/2018-19 दि.23/08/2018 अन्वयेची बांधकाम परवानगी.

12) या कार्यालयाचे पत्र क्र. मिभा/मनपा/नर/3893/2018-19 दि.14/09/2018 अन्वयेची सुधारीत बांधकाम परवानगी.

13) दि.23/09/2018 रोजीचे हमीपत्र.

आ.क्र.मनपा/नर/4432/2018-19 दि.29/12/2018

C.C. (Legal) 1812

29) यापूर्वी पत्र क्र. मिभा/मनपा/नर/1834/2017-18, दि.09/08/2017, पत्र क्र. मिभा/मनपा/नर/401/2018-19, दि.17/04/2018 व क्र. मिभा/मनपा/नर/3410/2018-19, दि.23/08/2018 अन्वये यासोबतच्या मंजूर रेखांकनात प्रस्तावित केलेल्या इमारतीचे बांधकाम खालीलप्रमाणे मर्यादीत ठेवून त्यानुसार कार्यान्वीत करणे बंधनकारक राहिल.

30) सदर परवानगीन्वये खालीलप्रमाणेच्या इमारतीसाठी रेखांकन नकाशांना प्रस्तावित High Rise Committee च्या मान्यतेकरिता तत्वतः मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | इमारतीचे नांव / प्रकार | संख्या | तळ + मजले | प्रस्तावित बांधकाम क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| 1 | 1(1ए,1बी) | 1 | पार्ट स्टिल्ट + पार्ट तळ + 1 ते 33 | 22275.85 चौ.मी. |

31) वरिलप्रमाणेच्या इमारतीसाठी सद्यस्थितीत त्यासमोर दर्शविल्याप्रमाणे बांधकाम परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | इमारतीचे नांव / प्रकार | संख्या | तळ + मजले | प्रस्तावित बांधकाम क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| 1 | 1(1ए,1बी) | 1 | पार्ट स्टिल्ट + पार्ट तळ + 1 ते 23 | 15611.91 |

32) यापूर्वी पत्र क्र. मिभा/मनपा/नर/3893/2018-19, दि.14/09/2018 अन्वये देण्यात आलेली मंजूरी (इमारत प्रकार 1अे व 1बी च्या मर्यादित) रद्द करण्यात येत आहे.

33) जागेवर रेन वॉटर हार्वेस्टींगची व्यवस्था करणे तसेच त्याबाबतची यंत्रणा स्वतंत्र ओव्हरटँक व प्लंबींग लाईनसह कार्यान्वीत ठेवणे व त्याबाबत पाणीपुरवठा विभागाकडील प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

34) प्रस्तावित इमारतीसाठी भोगवटा दाखल्यापूर्वी प्रती सदनिका 100 लिटर या क्षमतेची सौर उर्जा वरिल पाणी गरम करण्याची व्यवस्था (सोलार वॉटर हिटींग सिस्टीम) बसवून कार्यान्वीत करणे व त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नाहरकत दाखला सादर करणे आपणावर बंधनकारक राहिल.

35) भोगवटा दाखल्यापुर्वी वृक्ष प्राधिकरणाकडील नाहरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.

36) भोगवटा दाखल्यापूर्वी अग्निशमन विभागाकडील तात्पूरता नाहरकत दाखल्यामधील अटीशर्तींची पूर्तता करुन अंतिम नाहरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.

37) मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील अकृषिक परवानगीच्या आदेशामधील अटीशर्तींची पूर्तता करणे आपणावर बंधनकारक राहिल.

38) सदरची सुधारीत बांधकाम परवानगी 70.00 मी. उंचीच्या मर्यादित असून 70.00 मी. उंचीवरील बांधकाम बांधकामासाठी प्रस्तावित High Rise Committee ची मान्यता घेवून, जर High Rise Committee ने बदल सुचविले तर त्याप्रमाणे पुर्तता करणेसह सुधारित नकाशे सादर करुन मंजूरी प्राप्त करुन घेणे आपणावर बंधनकारक राहिल.

39) सदर बांधकाम प्रारंभपत्रान्वये 70.00 मी. पर्यंतच्या मर्यादित असून त्यावरिल उंचीसाठी प्रस्तावित High Rise Committee च्या मान्यतेसाठी तत्वतः मान्यता देत आहे.

40) यासोबतच्या मंजूर नकाशाच्या आधारे High Rise Committee साठी पुर्वबांधीलकी गृहित धरता येणार नाही. तसेच सदर बाबतीत High Rise Committee चे धोरण व निर्णय अंतिम राहिल.

41) दि.23/09/2018 रोजी विकासकाने सादर केलेल्या प्रस्तावित तलासरी हायवेने बाधीत नागरी सुविधा क्षेत्राखालील जागेचे क्षेत्र धृतगती महामार्ग प्राधिकरणामार्फत संपादित केल्यास नागरी सुविधा क्षेत्राची सुयोग्य आकाराची जागा मंजूर रेखांकनात इतरत्र स्थलांतरित करुन देण्याबाबत हमीपत्राचे पालन करणे आपणावर बंधनकारक राहिल.

